## :: नियमित फौजदारी खटला क्र. १२६/२०२० मधील निशाणी क्र. ०१ वरील आदेश ::

सदरचे प्रकरण आज रोजी प्रथम आदेशाकरीता आहे. मागील तारखेस यात दोषारोपपत्र दाखल झाले. परंतु, आरोपींतर्फे काही कागदपत्रे सादर करण्यात आली. तसेच तिन्ही आरोपींतर्फे वकील श्री. बंगेरा व श्री. पारकर यांचेतर्फे असे कळविण्यात आले की, **Special Writ Petition No. 5598/2020** मधील मा. सर्वोच्च न्यायालय यांच्या निरीक्षणानुसार आरोपींविरुद्ध भारतीय दंड विधान कलम ३०६ सह ३४ अन्वये खटला दाखल करता येवू शकत नाही. आरोपींतर्फे असेही कळविण्यात आले की, आरोपींविरुद्ध दाखल असलेला प्रथम माहिती अहवाल देखील रद्द करुन मिळावा अशीही विनंती मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे प्रलंबित आहे. त्यात त्यांनी अशीही विनंती केलेली आहे की, न्यायालयाने आरोपींविरुद्धच्या सदरच्या प्रथम माहिती अहवालाची व दोषारोपपत्राची दखल घेवू नये.

०२. यावर सरकारपक्षातर्फे विशेष सरकारी वकील श्री. पी. डी. घरत यांनी युक्तीवाद केला की, सदरच्या कोणत्याही प्रकरणांमध्ये मा. सर्वोच्च न्यायालय तसेच मा. उच्च न्यायालय, मुंबई यांपैकी कोणीही अद्यापपावेतो या न्यायालयाने या दोषारोपपत्राची दखल घेवू नये, असा स्पष्ट आदेश केलेला नाही. शिवाय, ते पुढे असेही म्हणतात की, मा. सर्वोच्च न्यायालय व मा. उच्च न्यायालय, मुंबई यांपुढे दाखल झालेले प्रकरण हे आरोपींची अटक व जामीन या मुद्यावर होते, मा. सर्वोच्च न्यायालय यांनी दिलेले निर्देश व काढलेले निष्कर्ष हे केवळ आरोपींच्या विविध अंतरीम अर्जांपुरतेच मर्यादीत आहेत. त्यामुळे विशेष सरकारी वकील श्री. घरत असा युक्तीवाद करतात की, आरोपींविरुद्ध समन्स जारी करण्यात यावे.

०३. आरोपींतर्फे दाखल करण्यात आलेली सर्व कागदपत्रे वाचली. विशेष सकारी वकील श्री. घरत यांनी आज दाखल केलेला खुलासा निशाणी क्र. १० वाचला. उभय पक्षांचा युक्तीवाद आणि माझेसमोरील कागदपत्र यांवरुन असे प्रतीत होते की, आज रोजी मा. सर्वोच्च न्यायालय किंवा मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचा कोणताही असा आदेश अस्तित्वात नाही की, या न्यायालयाने आरोपींविरुद्ध समन्स जारी करु नयेत. मा. वरिष्ठ न्यायालय यांनी सदरच्या आरोपींबाबतच्या विविध रिट अर्जांमध्ये जे जे निष्कर्ष नोंदविलेले आहेत ते अंतरीम विनंत्यांसंदर्भात आहेत. त्यामुळे त्यांचा विचार आत्ता करता येणार नाही. आरोपींची अटक, प्रतिप्रेषण (रिमांड), अंतरीम जामीन व जामीन यांवेळी जे जे निष्कर्ष नोंदविले गेले ते सर्व निष्कर्ष त्या अंतरीम विनंत्यांपुरते मर्यादीत आहेत, असे मला वाटते. त्यावेळचे निष्कर्ष व निकष आता दोषारोपपत्र दाखल झाल्यावर आरोपींच्या विरुद्ध समन्स जारी करत असताना लावणे योग्य होणार नाही. म्हणून मी आरोपींतर्फे करण्यात आलेल्या युक्तीवादाशी सहमत नाही. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

:: **आदेश** ::

०१. सदरच्या तिन्ही आरोपींविरुद्ध न्यायालयाने समन्स काढू नये अशी आरोपींची मौखिक विनंती स्वीकारण्यात येत नाही.

०२. आरोपी क्र. ०१ ते ०३ विरुद्ध भारतीय दंड विधान कलम ३०६, १०९ अन्वये समन्स जारी करण्यात यावे.

Digitally signed by Sunayana Sachinkumar Pingale
Date: 2020.12.17 11:19:23 +0530

अलिबाग.
दिनांक : १६/१२/२०२०

**(सौ. सुनयना स. पिंगळे)**
मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड–अलिबाग.